# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र



०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/ ४७१ /२०१८ पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा दिनांक ०१/०९/२०१८

## भंडारा जिल्हा पोलीसांची कार्यवाही

## जनावरांची अवैध वाहतुक करणारा ट्रक पकडला, ११,७०० रुपयाचा मुद्देमाल जप्त, १ आरोपी अटकेत

**पोलीस ठाणे लाखनी** : — दिनांक ३१/०८/२०१८ रोजी पोलीस अधीक्षक भंडारा विनीता साहू यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन लाखनीचे ठाणेदार दामोदर मंडलवार व सहकारी कर्मचा—यांनी वेळीच सर्तकता दाखवुन शिताफिने पिंपळगांव/सडक येथे जाणा—या ट्रक क्र. सीजी ०४/डीसी ९२८६ वाहन किंमती १०,००,०००/—रु. सदर ट्रक. मध्ये ७ फुट ५ इंच रुंद व २२ फुट व ६ इंच लांबीच्या ट्रकच्या डाल्यामध्ये ५ नग म्हशी व १२ नग हेले (रेडे) प्रत्येकी १० हजार आर.टी. ओ. यांचे परवानगी व पशुवैद्यकीय अधिका—यांचे प्रमाणपत्राशिवाय तसेच जनावरांचे आरोग्याबाबत व्यवस्था न करता अपु—या जागेत जनावरांना कोंबुन त्यांना त्रास होईल अश्या स्थितीत वाहतुक करतांनी मिळुन आल्याने आरोपींतान विरुध्द पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ११(१)(घ)(ड)सहकलम ११९ मपोका सहकलम ८३ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

अवैध वाहतुक करतांना ट्रकमध्ये मिळुन आल्याने सर्व गोधन (जनावर) यांना त्यांचे आरोग्याचे दृष्टीने गौशाला पिंपळगांव सडक येथील गोशाळेत ठेवण्यात आले आहेत. सदर गुन्हयात आरोपी जमीरखा जखीउल्ला खान, वय ५४ वर्षे, रा. कमर कॉलोनी टेकानाका कामठी रोड नागपुर यास अटक करण्यात आले आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक ताराम पोलीस स्टेशन लाखनी करीत आहेत.


(जितेद्रं के आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ९४०३१०९७२०


प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.